# 'एक पाऊल हरितक्रांतीकडे' अभियानाला प्रारंभ




### पर्यावरणाचे संतुलन राखण्यास वृक्षारोपण काळाची गरज : महापौर नंदा जिचकार

हिरवे नागपूर, सुंदर नागपूर' हे ब्रीद घेऊन नागपूर शहर हिरवे करण्याचे स्वप्न आहे. वाढत्या तापमानावर पर्याय आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले. राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी वृक्षारोपण अभियानांतर्गत १ जुलै ते ७ जुलै दरम्यान नागपुरात 'एक पाऊल हरितक्रांतीकडे' या अभियानाचा शुभारंभ महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते वृक्षारोपणाने झाला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. प्रतापनगर परिसरात आयोजित या वृक्षारोपण कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. या अभियानांतर्गत ४५ हजार वृक्ष नागपूर शहरात लावण्याचे उद्दिष्ट असून अनेक स्वयंसेवी संस्था, शिक्षण संस्था, कार्पोरेट क्षेत्र यात सहभागी होत आहे. नागरिकांनीही आपल्या घरासमोर एक वृक्ष लावून ते जगवण्याची जबाबदारी स्वीकारावी, असेही महापौर नंदा जिचकार यांनी केले.

उपमहापौर व आयुक्तांनी सुदामनगरी अंबाझरीत केले वृक्षारोपण अभियानाच्या पहिल्या दिवशी चार झोनअंतर्गत चार ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. धरमपेठ झोनअंतर्गत अंबाझरी सुदामनगरी येथे आयोजित कार्यक्रमाला उपमहापौर दीपराज पार्डीकर, आयुक्त अश्विन मुदगल, धरमपेठ झोन सभापती रूपा रॉय, स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीचे सभापती संजय बंगाले, महिला व बालकल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे, वैद्यकीय व आरोग्य विशेष समितीचे उपसभापती प्रमोद कौरती, नगरसेवक सुनील हिरणवार, नगरसेविका परिणिता फुके, शिल्पा धोटे, दर्शनी धवड, रुतिका मसराम, धरमपेठ झोनचे सहायक आयुक्त महेश मोरोणे, उद्यान अधीक्षक सुधीर माटे यांच्यासह गोपाल बावनकुळे उपस्थित होते. उपमहापौर दीपराज पार्डीकर आणि आयुक्त अश्विन मुदगल यांच्यासह उपस्थित सर्व मान्यवरांनी गुलमोहर, कडूनिंब, करंजी, कदम आदी वृक्षांचे रोपण केले. नागपूर शहर स्वच्छ, सुंदर आणि हिरवे करण्यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करून शहराप्रती असलेली आपली जबाबदारी पार पाडावी, असे प्रतिपादन आयुक्त अश्विन मुदगल यांनी केले.

स्थायी समिती सभापती व उपमहापौरद्वारा गोरेवाडा बगीचा व तलाव परिसरात वृक्षारोपण नागपूर

महानगरपालिकेच्या ‘एक पाऊल हरितक्रांतीकडे’ या अभियानाला विविध स्तरातून उत्तम प्रतिसाद लाभत आहे. मंगळवारी झोनअंतर्गत येणाऱ्या गोरेवाडा तलावाजवळ ग्रीन व्हिजील फाऊंडेशनच्या सहकार्याने वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, नासुप्रचे विश्वस्त व ज्येष्ठ नगरसेवक भूषण शिंगणे, मंगळवारी झोन सभापती सुषमा चौधरी यांनी वृक्षारोपण केले. यावेळी मंगळवारी झोनचे सहायक आयुक्त हरिश राऊत, नगरसेविका गार्गी चोपडा, प्रीतम मथरानी, उद्यान अधीक्षक सुधीर माटे, उद्यान निरीक्षक अनंता नागमोते यांच्यासह ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे संस्थापक कौस्तव चॅटर्जी, सुरभी जैस्वाल, स्मिताली उके व अन्य स्वयंसेवकांची उपस्थिती होती. उपस्थित सर्व मान्यवरांनी यावेळी वृक्षारोपण केले. यावेळी दीपक गिऱ्हे, नगरसेविका संगीता गिऱ्हे, अर्चना पाठक, रश्मी उईके, साक्षी राऊत, रेखा देणे, नितीन पाठक, शशिकांत हरडे, अश्विन खेवले, उपअभियंता गिरीश वासनिक, फरहा वसीम, ज्ञानेश्वर ससनकर यांच्यासह बहुसंख्य गणमान्य नागरिक उपस्थित होते.

उपमहापौर व विरोधी पक्ष नेत्यांच्या हस्ते दर्शन कॉलनी उद्यान परिसरात वृक्षारोपण नेहरूनगर झोनअंतर्गत येणाऱ्या दर्शन कॉलनीतील प्रस्तावित उद्यानात उपमहापौर दीपराज पार्डीकर, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे आणि झोन सभापती रेखा साकोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. माजी नगरसेविका मालू वनवे, नेहरूनगर झोनचे सहायक आयुक्त राजेश कराडे, उद्यान अधीक्षक सुधीर माटे, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यावेळी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी यावेळी वृक्षारोपण करत ‘एक व्यक्ती एक झाड’ लावण्याचा संदेश दिला.

सुर्वे लेआऊट उद्यानमध्ये वृक्षारोपण लक्ष्मीनगर झोनअंतर्गत येणाऱ्या सुर्वे लेआऊट उद्यानात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी झोन सभापती प्रकाश भोयर, नगरसेविका वनिता दांडेकर, तारा(लक्ष्मी) यादव, पल्लवी श्यामकुळे, मिनाक्षी तेलगोटे, सोनाली कडू, उज्ज्वला बनकर, प्रणिता शहाणे, नगरसेवक लखन येरावार, लहुकुमार बेहेते, प्रमोद तभाने, सहायक आयुक्त सुवर्णा दखने, उद्यान अधीक्षक सुधीर माटे, उपअभियंता रवींद्र मुळे, झोनचे कर्मचारी उपस्थित होते.

# विवेकानंदांचे तेजस्वी विचार आचरणात आणल्यास भविष्यकाळ उज्ज्वल होईल - महापौर नंदा जिचकार



### स्वामी विवेकानंद पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन

स्वामी विवेकानंदांचे तेजस्वी जीवन अन् उद्‌बोधक विचार मानवी जीवनाची दिशा बदलून टाकतात व आदर्शाच्या ठिकाणी पोहोचवतात, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.

स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त अंबाझरी येथील विवेकानंद स्मारक येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समितीचे माजी सभापती व ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, लक्ष्मीनगर झोन सभापती प्रकाश भोयर, धरमपेठ झोन सभापती रुपा राय, महिला व बालकल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे, नगरसेविका परिणिता फुके, रुतिका मेश्राम, नगरसेवक अमर बागडे यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना महापौर नंदा जिचकार पुढे म्हणाल्या, जीवनात उच्च आदर्शाची स्थापना व त्यासाठी मनाची जडणघडण ही लहान वयातच व्हावी लागते. त्यासाठी स्वामी विवेकानंदांचे विचार उपयुक्त असून, पाल्यांना हे विचार लहान वयातच समजले पाहिजेत. स्वामी विवेकानंद यांचे प्रेरक व तेजस्वी विचार आचरणात आणल्यास आपला भविष्यकाळ निश्चितच उज्ज्वल होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अन्य मान्यवरांनीही यावेळी विवेकानंदांच्या आदर्शावर चालण्याचे आवाहन केले. यावेळी अनेक गणमान्य नागरिक उपस्थित होते. स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून मान्यवरांनी पुण्यतिथीनिमित्त अभिवादन केले.

# नागपूर शहराला 'ग्रीन सिटी' पुरस्कार



### महापौर, आयुक्तांनी केला 'ग्रीन व्हिजील' सदस्यांचा सत्कार

जगात पर्यावरण क्षेत्रात कार्य करणाऱ्या 'अर्थ डे नेटवर्क'द्वारे आयोजित 'शहर ग्रीन करो ४७ सिटीज कॉन्टेस्ट' मध्ये देशातील १२ शहरांना पुरस्कृत करण्यात आले असून नागपूरचा त्यात समावेश आहे. महानगरपालिकेच्या खांद्याला खांदा लावून पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या आणि या पुरस्कारात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ग्रीन व्हिजील फाऊंडेशन या पर्यावरण विषयक कार्य करणाऱ्या संस्थेच्या सदस्यांचा शुक्रवार ७ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज नवीन प्रशासकीय सभागृहात आयोजित कार्यक्रमात महापौर नंदा जिचकार, आयुक्त अश्विन मुदगल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, आयुक्त अश्विन मुदगल, प्रतोद दिव्या धुरडे, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीचे उपसभापती प्रमोद कौरती, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, मुख्य अभियंता विजय बनगीरवार, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) संजय गायकवाड, कार्यकारी अभियंता (स्लम) डी.डी. जांभूळकर, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, कार्यकारी अभियंता राजेश भूतकर, कार्यकारी अभियंता दिलीप जामगडे, शहर अभियंता एम. एच. तालेवार आदी उपस्थित होते.

उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव यांनीही पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कौस्तव चॅटर्जी यांनी उपस्थितांना पुरस्काराबद्दल माहिती दिली. अर्थ नेटवर्क ही संस्था जगातील सर्वात मोठी पर्यावरणविषयक काम करणारी संस्था असून भारतातील ४७ शहरांसाठी त्यांनी 'शहर ग्रीन करो ४७ सिटीज' ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. पर्यावरण रक्षणात ग्रीन व्हिजील काय करते, मनपा काय करते, शहरातील माध्यमे किती जागरूक आहेत आणि सामान्य नागरिक किती जागरूक आहे, या निकषांवर ही स्पर्धा होती. इतर शहरांना मागे टाकत नागपूर शहर हे निकषांवर उतरले आणि पुरस्कार पटकाविल्याचे कौस्तव चॅटर्जी यांनी सांगितले.

संस्थेच्या संस्थापक डॉ. कविता रतन आणि संस्थापक कौस्तव चॅटर्जी यांच्या मार्गदर्शनात संस्थेचे कार्य सुरू असून 'अर्थ अवर' (पौर्णिमा दिवस) हा उपक्रम आमदार प्रा. अनिल सोले हे महापौर असताना त्यांच्या पुढाकारातून राबविण्यास

सुरुवात झाली. नंतर माजी महापौर प्रवीण दटके आणि सध्याच्या महापौर नंदा जिचकार यांनी या उपक्रमाला बळ दिले. नागपुरात गेल्या काही वर्षापासून हा उपक्रम अव्याहतपणे राबविण्यात येत आहे. पर्यावरण संवर्धनाच्या इतर कार्यातही ग्रीन व्हिजीलचा सहभाग असून जनजागृतीचे कार्य करीत आहे. या संस्थेचे कौस्तव चॅटर्जी यांच्यासह सुरभी जैस्वाल, मेहुल कोसुरकर, कल्याणी वैद्य आणि विष्णूदेव यादव यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# मोकळ्या प्लॉटवरील कचरा उचला अन्यथा जप्तीची कारवाई



### महापौरांचा इशारा : स्वच्छतेसाठी मनपा उचलणार कडक पावले

नागपूर शहरात असंख्य रिक्त भूखंड आहेत. या भूखंडाकडे मालकांचे लक्ष नाही. अशा भूखंडावर साचलेल्या कचऱ्यामुळे, झुडुपांमुळे पावसाचे पाणी साचून राहते. यामुळे डासांची उत्पत्ती होऊन रोगराई पसरते. भूखंड स्वच्छ ठेवणे ही भूखंड मालकाची जबाबदारी आहे. पुढील सात दिवसांत असे भूखंड स्वच्छ करण्यात आले नाही तर संबंधित भूखंडधारकांना नोटीस बजावून जप्तीची कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापौर नंदा जिचकार यांनी दिला.

ओला आणि सुका कचरा वर्गीकरणासंदर्भातील आढावा बैठकीत त्यांनी सदर इशारा दिला. बैठकीला उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, आयुक्त अश्विन मुदगल, प्रतोद दिव्या धुरडे, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, वैद्यकीय व आरोग्य सेवा समितीचे उपसभापती प्रमोद कौरती यांच्यासह अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, मुख्य अभियंता विजय बनगीरवार, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, स्वच्छ भारत मिशनमधील सल्लागार डॉ. अशोक उरकुडे आणि दहाही झोनचे सहायक आयुक्त उपस्थित होते.

सदर आढावा बैठकीत पावसाळ्यातील स्वच्छतेचा आढावा घेण्यात आला. यावेळी खुल्या तसेच रिक्त भूखंडाचा विषय प्रामुख्याने चर्चेला आला. यासंदर्भात उपस्थित पदाधिकाऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. अशा भूखंडांच्या मालकांचा पत्ता नसतो. वर्षोनुवर्षे असे भूखंडा मालकांच्या देखरेखीविना पडून आहेत. तेथे कचरा जमा होतो. या भूखंडावर पाणी साचते. त्या पाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे डासांची उत्पत्ती होते. यातून डेंगू, मलेरिया, फायलेरिया आणि अन्य साथीचे रोग पसरण्याची शक्यता असते. नव्हे, असे भूखंडच हे साथीचे रोग पसरविण्यात कारणीभूत असतात. प्रत्येक झोनमधील असे भूखंड कर आकारणी विभागाच्या मदतीने शोधण्याचे आदेश महापौर नंदा जिचकार आणि आयुक्त अश्विन मुदगल यांनी सहायक आयुक्तांना दिले. त्यांना तातडीने नोटीस बजावून सात दिवसांच्या आत त्यावरील साफसफाई करण्यात यावी. जे भूखंडमालक साफसफाई करवून घेणार नाही त्या भूखंडावरील साफसफाई मनपा करेल. तो खर्च भूखंडमालकाकडून वसूल करण्यात येईल आणि त्या भूखंडांवर जप्तीची कारवाई करण्याचे निर्देशही महापौरांनी दिले. नाग नदी स्वच्छतेनंतर उपसा

झालेला गाळ आणि पावसामुळे वाहून जमा झालेला गाळ अशा जागा तातडीने निश्चित करण्यात याव्यात आणि सात दिवस या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची मोहीम राबविण्याचे निर्देशही महापौर नंदा जिचकार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

ओला आणि सुका कचरा निर्मितीस्थळावरून वेगळा करण्यासाठी मागील आढावा बैठकीत ठरल्यानुसार झोनस्तरावर ३० टक्के परिसर निश्चित करण्यात आला आहे. या परिसरातील कुटुंबांना कचरापेटी वाटपाचे काम प्रगतीपथावर आहे. १० झोनला प्रत्येकी एक हजार कचरापेट्या पुरविण्यात आल्या होत्या. त्यापैकी आतापर्यंत ७२०० म्हणजे ७२ टक्के कचरापेट्यांचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर यांनी दिली.

**ऑनलाईन नोंदणीची अट रद्द**

महानगरपालिकेकडून कचरा पेट्या मिळविण्यासाठी ऑनलाईन नोंदणी गरजेची होती. मात्र यामुळे मोहिमेचा वेग मंदावला होता. ३१ जुलैपर्यंत शहरातील ३० टक्के भागातून जर ओला आणि सुका कचरा विलग करणे सुरू करायचे असेल तर तातडीने कचरापेट्या नागरिकांपर्यंत पोहचायला हव्या, अशी सूचना समोर आली होती. त्यामुळे मागील आढावा बैठकीत कचरापेटीसाठी ऑनलाईन नोंदणीची अट रद्द करण्यात आली. आता सहायक आयुक्तांनी संबंधित झोनमध्ये जो ३० टक्के परिसर निवडला आहे त्या परिसरात ३१ जुलैपर्यंत कचरा पेट्या वाटप होतील आणि ओला आणि सुका कचरा स्वतंत्रपणे मनपा यंत्रणेकडे सोपविण्याचे कार्य सुरू होईल, असा विश्वास सर्व सहायक आयुक्तांनी महापौर आणि आयुक्तांना दिला.

**‘कनक’ने वेग वाढविण्याचे आदेश**

ओला आणि सुका कचरा निर्मितीस्थळापासून नागरिक वेगळा देत असेल तर तो प्राथमिक कचरा संकलन केंद्र आणि पुढे भांडेवाडी डम्पिंग यार्डपर्यंत वेगवेगळ्या स्वरूपातच जायला हवा. ही जबाबदारी कचरा संकलन करणाऱ्या कनक रिर्सोसेसची असून त्यांनी वेगवेगळ्या स्वरूपात कचरा संकलन करण्यासाठी असलेल्या गाड्यांची संख्या तातडीने वाढविण्याचे निर्देश आयुक्त अश्विन मुदगल यांनी ‘कनक’च्या अधिकाऱ्यांना दिले.

# मनपाच्या योजनांची ई.रिक्षाद्वारे “स्मार्ट” जनजागृती



### धरमपेठ झोनला ई-रिक्षा सुपूर्दः प्रदूषणमुक्त आणि पैश्यांची बचत

स्थायी समिती अध्यक्ष संदीप जाधव यांनी या ई-रिक्षाला हिरवी झेंडी दाखवली. यावेळी प्रामुख्याने सत्तापक्षनेते संदीप जोशी, मनपा आयुक्त अश्विन मुदगल, जलप्रदाय समिती सभापती राजेश घोडपागे, महिला व बालकल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे, धरमपेठ झोन सभापती रुपा राय, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, नगरसेविका परिणीता फुके, अमर बागडे, कमलेश चौधरी, उज्वला शर्मा, रुतिका मसराम, प्रमोद कौरती, सुनील हिरणवार, सहायक आयुक्त (कर) मिलिंद मेश्राम, धरमपेठ झोनचे सहायक आयुक्त महेश मोरोणे, धरमपेठ झोनचे अधिकारी व कर्मचा-यांची उपस्थिती होती.

मनपाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृतीकरिता आजवर वापरण्यात येणा-या ऑटोवर मोठ्याप्रमाणावर खर्च होत होते. शिवाय याद्वारे प्रदूषणही होत होते. झोनचे सहायक आयुक्त महेश मोरोणे यांनी ई-रिक्षाची संकल्पना झोन सभापती रुपा राय यांच्याकडे मांडली. या संकल्पनेला प्रतिसाद देत, सभापती रुपा राय यांनी आपल्या स्वच्छा निधीतून ई-रिक्षा साठी निधी मंजुर केला. झोनकडे स्वतःचे ई-रिक्षा आल्याने याद्वारे प्रदूषणमुक्त आणि अल्प खर्चात मनपाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवता येणार आहेत. ई-रिक्षा एकवेळा पूर्ण चार्ज केल्यावर 8 तास उपयोगात येतो. तसेच झोनच्या कर्मचा-यांनाही देखिल एखादी तक्रार सोडविण्यासाठी जायचे असल्यास चार कर्मचारी यामध्ये बसून जाऊ शकतात अशी व्यवस्था आहे. अशा प्रकारे बहुउपयोगी “ई-रिक्षा” द्वारे स्मार्ट पद्धतीने धरमपेठ झोन मनपाच्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणार आहे. ई-सेवा पुरविणारे नवीन अद्ययावत केंद्रदेखिल मनपाचे धरमपेठ झोनमध्ये सुरु झाले होते, हे विशेष. या अद्ययावत केंद्राचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते करण्यात आले होते.

**अभय योजना जनजागृतीसाठी उपयुक्त**

17 जुलै ते 7 ऑगस्ट 2017 दरम्यान मनपातर्फे राबविण्यात येणा-या अभय योजनेची जनजागृती करण्यासाठी हे ई-रिक्षा उपयुक्त ठरणार असून याद्वारे प्रदूषणमुक्त आणि कमी खर्चात अभियानाची जनजागृती करण्यात येईल हे विशेष.

नागपूर महानगरपालिकेच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने धरमपेठ झोनने ई-रिक्षा खरेदी केला

असून "पब्लीक अनाऊंसमेंट सिस्टीम"द्वारे मनपाच्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

स्थायी समिती अध्यक्ष संदीप जाधव यांनी या ई-रिक्षाला हिरवी झेंडी दाखवली. यावेळी प्रामुख्याने सत्तापक्षनेते संदीप जोशी, मनपा आयुक्त अश्विन मुदगल, जलप्रदाय समिती सभापती राजेश घोडपागे, महिला व बालकल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे, धरमपेठ झोन सभापती रुपा राय, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, नगरसेविका परिणीता फुके, अमर बागडे, कमलेश चौधरी, उज्वला शर्मा, रुतिका मसराम, प्रमोद कौरती, सुनील हिरणवार, सहायक आयुक्त (कर) मिलिंद मेश्राम, धरमपेठ झोनचे सहायक आयुक्त महेश मोरोणे, धरमपेठ झोनचे अधिकारी व कर्मचा-यांची उपस्थिती होती.

मनपाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृतीकरिता आजवर वापरण्यात येणा-या ऑटोवर मोठ्याप्रमाणावर खर्च होत होते. शिवाय याद्वारे प्रदूषणही होत होते. झोनचे सहायक आयुक्त महेश मोरोणे यांनी ई-रिक्षाची संकल्पना झोन सभापती रुपा राय यांच्याकडे मांडली. या संकल्पनेला प्रतिसाद देत, सभापती रुपा राय यांनी आपल्या स्वच्छा निधीतून ई-रिक्षा साठी निधी मंजुर केला. झोनकडे स्वतःचे ई-रिक्षा आल्याने याद्वारे प्रदूषणमुक्त आणि अल्प खर्चात मनपाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवता येणार आहेत. ई-रिक्षा एकवेळा पूर्ण चार्ज केल्यावर 8 तास उपयोगात येतो. तसेच झोनच्या कर्मचा-यांनाही देखिल एखादी तक्रार सोडविण्यासाठी जायचे असल्यास चार कर्मचारी यामध्ये बसून जाऊ शकतात अशी व्यवस्था आहे. अशा प्रकारे बहुउपयोगी “ई-रिक्षा” द्वारे स्मार्ट पद्धतीने धरमपेठ झोन मनपाच्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणार आहे. ई-सेवा पुरविणारे नवीन अद्ययावत केंद्रदेखिल मनपाचे धरमपेठ झोनमध्ये सुरु झाले होते, हे विशेष. या अद्ययावत केंद्राचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते करण्यात आले होते.

**अभय योजना जनजागृतीसाठी उपयुक्त**

17 जुलै ते 7 ऑगस्ट 2017 दरम्यान मनपातर्फे राबविण्यात येणा-या अभय़ योजनेची जनजागृती करण्यासाठी हे ई-रिक्षा उपयुक्त ठरणार असून याद्वारे प्रदूषणमुक्त आणि कमी खर्चात अभियानाची जनजागृती करण्यात येईल हे विशेष.

# एम्प्रेस मॉलसह इतर मोठ्या बकायाधारकांच्या घरासमोर नगारे वाजवून गांधीगिरी




### ‘मालमत्ता व पाणी कर अभय योजने’चा लाभ घ्या आणि कारवाई टाळण्याचे आवाहन

थकीत मालमत्ता आणि पाणी कर असणाऱ्या ग्राहकांसाठी मनपाने अभय योजना आणली आहे. १७ जुलै ते ७ ऑगस्ट दरम्यान राबविण्यात येणाऱ्या या योजनेचा लाभ घ्या, थकीत कर भरा आणि मालमत्तेवरील जप्तीची कारवाई टाळा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शहरातील लाखो नागरिक मालमत्ता व पाणी कर वेळेत भरून शहराच्या विकासात आपले योगदा देतात. मात्र, काही निवडक व्यावसायिक प्रतिष्ठाने आणि नागरिकांकडे कोट्यवधींची कर थकबाकी आहे. अशा कुंभकर्णी झोपेत असणाऱ्या थकबाकीदारांना जागे करण्यासाठी मनपातर्फे गांधीगिरीचा मार्ग स्वीकारण्यात आला असून मनपाच्या दहा झोनमधील ‘टॉप टेन’ थकबाकीदारांच्या प्रतिष्ठानांपुढे आणि घरांपुढे नगारे वाजविण्यात आले.

याअंतर्गत मंगळवार १८ जुलै रोजी गांधीसागरजवळील एम्प्रेस मॉल येथे धंतोली झोनचे सभापती प्रमोद चिखले, माजी सत्तापक्ष नेते दयाशंकर तिवारी, जलप्रदाय समिती सभापती राजेश घोडपागे, दुर्बल घटक विशेष समिती सभापती महेंद्र धनविजय यांच्या नेतृत्वात एम्प्रेस मॉल मुख्य प्रवेशद्वारासमोर नगारा वाजवून बकाया असलेली रक्कम भरण्याबाबत आवाहन करण्यात आले.

यावेळी महिला व बालकल्याण समिती उपसभापती श्रद्धा पाठक, विधी समितीच्या सभापती ॲड. मिनाक्षी तेलगोटे, नगरसेवक विजय चुटेले, नगरसेविका वंदना यंगटवार, सरला नायक, पल्लवी शामकुळे, सोनाली कडू, माजी नगरसेविका रश्मी फडणवीस, मंगलाबेन पटेल, वर्षा मेहर, शाम चांदेकर, विजय रेहपांडे, दीपांशू लिंगायत, राहूल खंगार, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, मनपा टॅक्स विभागाचे कर निरीक्षक विजय थूल, सुभाष बैसाल, जलप्रदाय विभागाचे डेलिगेट एस.डी. तारे, कविता इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत दुपारी १२ वाजता नगारे वाजविण्यात आले. एम्प्रेस मॉल प्रतिनिधी यांना पुष्पगुच्छ देण्यात आले आणि योजनेचा लाभ घेत आपली पाटी कोरी करा आणि शहराच्या विकासात योगदान द्या, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

**आसीनगर झोन**

आसीनगर झोनअंतर्गत येणाऱ्या वॉर्ड क्र.५४ मधील नारायण जयराम लवात्रे यांच्या घरासमोर गांधीगिरी करण्यात आली. त्यांच्या घरासमोर नगारा वाजवून त्यांना पुष्पगुच्छ देण्यात आले. त्यांच्याकडे दोन लाख ६६ हजार मालमत्ता कर सन २००६ पासून थकीत आहे. या कारवाईत आसीनगर झोन सभापती भाग्यश्री कानतोडे, बसपाचे पक्ष नेते शेख मोहम्मद जमाल, नगरसेविका भावना लोणारे, नेहा निकोसे, नसीम बानो खान, वंदना चांदेकर, वैशाली नारनवरे, विरंका भिवगडे, मंगला लांजेवार, नगरसेवक दिनेश यादव, मनोज सांगोळे, परसराम मानवटकर, गोपीचंद कुमरे, जितेंद्र घोडेस्वार, मो. ईब्राहीम तौफिक अहमद, संदीप सहारे, झोनचे सहायक आयुक्त विजय हुमणे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

**लक्ष्मीनगर झोन**

लक्ष्मीनगर झोन अंतर्गत येणाऱ्या 'सरदारजीकी रसोई' येथे लक्ष्मीनगर झोनचे सभापती प्रकाश भोयर यांच्या नेतृत्वात नगारा वादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या प्रतिष्ठानासमोर बॅनर लावण्यात आले. प्रतिष्ठानचे शटर बंद असल्यामुळे प्रवेशद्वारासमोर पुष्पगुच्छ ठेवण्यात आले. य़ा प्रतिष्ठानाकडे ५६ लाख २२ हजार रुपयांची थकबाकी आहे. यावेळी विधी समिती सभापती ॲड. मिनाक्षी तेलगोटे, नगरसेवक लहुकुमार बेहते, नगरसेविका पल्लवी शामकुळे, सोनाली कडू, विशाखा मोहोड, जयश्री वाडीभस्मे यांची उपस्थिती होती.

**धरमपेठ झोन**

धरमपेठ झोनअंतर्गत येणाऱ्या भगवाघर लेआऊट येथील कंट्रीवाईड व्हॅकेशन आणि हिबिस्कस हॉटेल यांच्या प्रतिष्ठानासमोर नगारे वाजविण्यात आले. कंट्रीवाईड व्हॅकेशन यांच्याकडे १७ लाख रुपयांचा कर थकीत आहे. यापैकी पाच लाखांचा डी.डी. मालमत्ता मालकाने आज अधिकाऱ्यांकडे सोपविला. उर्वरीत रक्कम २५ तारखेपर्यंत भरण्याचे आश्वासन त्यांनी दिले. हिबिस्कस हॉटेल यांच्याकडे १४.५० लाखांचा कर थकीत आहे. ही रक्कम २४ जुलैपर्यंत भरणार असल्याचे आश्वासन मालमत्ताधारकाने दिले. या कारवाईच्या वेळी स्थापत्य समिती सभापती संजय बंगाले, महिला व बालकल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे, ज्येष्ठ नगरसेवक सुनील हिरणवार, नगरसेवक प्रमोद कौरती, नगरसेविका उज्ज्वला शर्मा, परिणिता फुके, प्रगती पाटील, रुतिका मसराम, धरमपेठ झोनचे सहायक आयुक्त महेश मोरोणे उपस्थित होते.

# शाळांची दशा व दिशा बदलविण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची . सभापती प्रा.दिलीप दिवे




### पुनर्रचित अभ्यासक्रम पाठ्यपुस्तक प्रशिक्षण वर्गाला आकस्मिक भेट

नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे व त्यांच्या भविष्याला नव दिशा मिळावी याकरिता शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे असे प्रतिपादन मनपा शिक्षण समिती सभापती दिलीप दिवे यांनी केले. साने गुरूजी उर्दू शाळेत सुरूअसलेल्या इयत्ता ७ वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रम पाठ्यपुस्तक प्रशिक्षण वर्गाला आकस्मिक भेट प्रसंगी ते बोलत होते.यावेळी त्यांच्यासमवेत उपसभापती स्नेहल बिहारे, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, सहायक शिक्षणाधिकारी मीना गुप्ताउपस्थित होते.

पुढे बोलताना सभापती दिवे म्हणाले, भविष्यात प्रत्येक कार्य घरी बसून करता येणार आहे तेव्हा अश्या प्रशिक्षणाचीआवश्यकता आहे. स्वताःच्या विद्यार्थांच्या भवितव्याबद्दल जागरूक राहण्याचे आवाहन त्यांनी शिक्षकांना केले. मनपाच्याकिमान १० शाळा अश्या तयार करा ज्या नागपुरातील शाळांच्या स्पर्धेत उतरेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. याप्रशिक्षणवर्गाचा लाभ सर्व विद्यार्थांपर्यंत पोहचविण्याचा आदेश सभापतींनी दिला. उपसभापती स्नेहल बिहारे यांनी महानगरपालिकेच्याविद्यार्थांचा शैक्षणिक दर्जा शिक्षकांनी उंचविण्याची अपेक्षा व्यक्त केली. शिक्षकांनी जुनी मानसिकता बदलवून नव्या बदलांनासामोरे जाण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार यांनी केले.

कार्यक्रमाला सर्व शिक्षा अभियानाचे सहायक कार्यक्रम अधिकारी धनलाल चौलीवार, प्रशिक्षण प्रमुख संध्या पवार, प्रशिक्षणसमन्वयक राजेंद्र घाईत, संजय भाटी, शेषराव उपरे, शुभांगी वाघमारे उपस्थित होते.

# गणेश विसर्जनापूर्वी कृत्रिम तलावांचे बांधकाम पूर्ण करा . आयुक्त अश्विन मुदगल



### मनपा आयुक्तांनी घेतला गणेश विसर्जन पूर्वतयारीचा आढावा

पर्यावरणा संवर्धनाबद्दल नागरिकांमध्ये जनजागृती वाढली आहे. कृत्रिम तलावांमध्ये गणेश विसर्जनाला नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभत आहे. हे लक्षात घेता शहरातील तलावांमध्ये बांधण्यात येणाऱ्या विसर्जनासाठीच्या कृत्रिम तलावांचे बांधकाम गणेशोत्सवापूर्वी पूर्ण करा. शहरातील विविध परिसरातील मूर्ती विसर्जनाचे प्रमाण लक्षात घेता कृत्रिम तलावांच्या संख्येत आवश्यकतेनुसार वाढ करा, असे निर्देश महानगरपालिकेचे आयुक्त अश्विन मुदगल यांनी दिले.

शहरातील विविध तलावांजवळ गणेश विसर्जनासाठी मनपा व पोलिस विभागातर्फे करण्यात येणाऱ्या पूर्व तयारीचा आढावा मनपा आयुक्तांनी शनिवारी (ता. 29 जुलै) घेतला. विसर्जनाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या सोयी सुविधा उपलब्ध करण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिलेत.

शनिवारी आयुक्तांनी गांधीसागर, सक्करदरा, सोनेगाव, अंबाझरी, फुटाळा तलाव येथील सोयीसुविधांचा आढावा घेतला. यावेळी उपायुक्त जयंत दांडेगावकर, पोलिस उपायुक्त (विशेष शाखा) नीलेश भरणे, आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप दासरवार, पशुचिकित्सा अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, सहायक आयुक्त गणेश राठोड, महेश मोरोणे, राजेश कराडे, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नरेश बोरकर, नगरसेविका हर्षला साबळे यांची उपस्थिती होती.

गेल्यावर्षी कृत्रिम तलावांचा झालेला उपयोग, नागरिकांचा मिळालेला प्रतिसाद आणि आलेल्या समस्यांबद्दल यावेळी आयुक्तांनी माहिती जाणून घेतली. तसेच परिसरातील नागरिकांनाही याबद्दल विचारपूस केली. नागरिकांनीही कृत्रिम तलावाचा विसर्जनासाठी वापर करावा, असे आवाहन आयुक्त अश्विन मुदगल यांनी केले. पाहणी दरम्यान तलाव येत असलेल्या हद्दीतील पोलिस ठाण्याच्या ठाणेदारांचीही यावेळी उपस्थिती होती.

# दिव्यांगांसाठी आरक्षित गाळ्यांची सोडत



दिव्यांगाना महानगरपालिकेच्या वतीने व्यवसायासाठी बाजार परिसरात दुकाने देण्यात यावे, ही मागणी सोमवारी सत्यात उतरली. महानगरपालिकेच्या बाजार विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या दुकानांसाठी सोमवारी सोडत काढण्यात आली. तीन दिव्यांगांना दुकाने तर दोघांना ओटे वाटप करण्यासाठी ही सोडत होती.

उपायुक्त रवींद्र देवतळे यांनी ही प्रक्रिया पार पाडली. यावेळी नगरसेवक दिनेश यादव उपस्थित होते. प्रारंभी दुकान वाटपासंदर्भात दिव्यांगांच्या प्रतिनिधींनी चर्चा केली. उपायुक्त रवींद्र देवतळे म्हणाले, दिव्यांग संघटनांसोबत सकारात्मक चर्चा झाल्यानंतर दुकान आणि ओटे वाटपासंदर्भात धोरण ठरविण्यात आले. त्यानुसार सध्या रिक्त असलेल्या दुकान आणि ओट्यांमध्ये तीन टक्के आरक्षित करण्यात आले. या तीन टक्क्यानुसार तीन दुकाने आणि दोन ओट्यांसाठी सोडत काढण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. यानंतर मनपातर्फे तयार करण्यात येत असलेल्या हॉकर्स झोनमध्येही दिव्यांगांना ते ज्या झोनमधील रहिवासी आहेत, त्या भागात त्यांना जागा उपलब्ध करून देण्यात येईल, अशी माहितीही श्री. देवतळे यांनी दिली. यानंतर काढण्यात आलेल्या सोडतीत विजय बाबूराव मेंढे, रवी प्यारेलाल चुटेले आणि गजानन डोमकावळे यांचे नाव दुकानासाठी तर अमर नगरवाडीया आणि उदय मिसाळ यांचे नाव ओट्यासाठी जाहीर करण्यात आले. मनपाने पुढाकार घेऊन दिव्यांगांसाठी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून ही प्रक्रिया सुरू केल्याबद्दल उपस्थित सर्व दिव्यांग बांधवांना मनपा प्रशासनाचे आभार मानले.

# सफाई कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी : महापौर नंदा जिचकार



नागपूर महानगरपालिका, नागपूर
(आरोग्य विभाग)

गुणवंत सफाई कामगारांची यादी
वर्ष २०१७

| | | | |
|---|---|---|---|
| | झोन क्र १ लक्ष्मीनगर | | झोन क्र ६ गांधीबाग |
| १) | श्री.कुंदन नारायण वाढे | १) | श्री.अर्जुन शोभालाल रार्णे |
| २) | श्री.राजू तुळशीराम नंदेश्वर | २) | श्री.दिगांबर रामचंद्र मेश्राम |
| ३) | श्रीमती मंदा लखन शिक्कलवार | ३) | श्रीमती गिरजा बसंता कोटांगळे |
| ४) | श्री. जयवंत रामचंद्र कांबळे (ऐवजदार) | ४) | श्री. पांडूरंग हरीभाऊ गडीकर (ऐवजदार) |
| ५) | श्रीमती सरोज श्याम पडगीलवार (ऐवजदार) | ५) | श्रीमती पुष्पा धनराज बिरहा (ऐवजदार) |
| | झोन क्र २ धरमपेठ | | झोन क्र ७ सतरंजीपुरा |
| १) | श्री. रमणीक मुलचंद डागोर | १) | श्री. कचरू शिवलाल चिमोटे |
| २) | श्री. बैजू दुर्गा मांजरे | २) | श्री. भाऊराव वामन गेडाम |
| ३) | श्रीमती मुन्नी अशोक शेवते | ३) | श्रीमती रामरती जयराम पिपरेल |
| ४) | श्री. विलास संपत रंगारी (ऐवजदार) | ४) | श्री भाऊराव शंकर गजभिये (ऐवजदार) |
| ५) | श्रीमती रेखा दिनेश अंद्रीकापुरे (ऐवजदार) | ५) | श्रीमती इंदिरा राजपाल सिरसौया (ऐवजदार) |
| | झोन क्र ३ हनुमाननगर | | झोन क्र ८ लकडगंज |
| १) | श्री. महेन्द्र हरीचंद गजभिये | १) | श्री. मोहन गुलाब चौव्हान |
| २) | श्री. रमेश भगवान फुलझेले | २) | श्री. अशोक मोहन वासनिक |
| ३) | श्रीमती शारदा राजू बक्सरे | ३) | श्रीमती संगिता मिलींद वासनिक |
| ४) | श्री. इंद्रपाल गोपाल कांबळे (ऐवजदार) | ४) | श्री. जितेन्द्र मारोतराव मोरे (ऐवजदार) |
| ५) | श्रीमती माया संतोष कापसे (ऐवजदार) | ५) | श्रीमती आशा हिरालाल शेन्डे (ऐवजदार) |
| | झोन क्र ४ धंतोली | | झोन क्र ९ आशीनगर |
| १) | श्री. बंडू वासुदेव कळसकर | १) | श्री. फुलचंद श्यामराव नंदेश्वर |
| २) | श्री. लालाजी दशरथ लांडगे | २) | श्री. सदाशिव गोमा वाहणे |
| ३) | श्रीमती रामबाई सुरेश खरे | ३) | श्रीमती भागेरती राजू खरे |
| ४) | श्री. विजय भिवाजी कांबळे (ऐवजदार) | ४) | श्री हरीचंद्र राजाराम बंजारी (ऐवजदार) |
| ५) | श्रीमती लिला पुरुषोत्तम धनविजय (ऐवजदार) | ५) | श्रीमती रमा पुंडलिक मेश्राम (ऐवजदार) |
| | झोन क्र ५ नेहरूनगर | | झोन क्र १० मंगळवारी |
| १) | श्री. दिलीप श्याम सहारे | १) | श्री. भिमराव भिवाजी लोखंडे |
| २) | श्री. देवचंद महादेव गुरुदेव | २) | श्री. अशोक पांडूरंग दिवटे |
| ३) | श्रीमती सुनिता दशराम बक्सरे | ३) | श्रीमती शिला दिलीप उमरकर |
| ४) | श्री. झडबा सिताराम तिरपुडे (ऐवजदार) | ४) | श्री. अनिल लक्ष्मण गढपायले (ऐवजदार) |
| ५) | श्रीमती आशा विठ्ठल अंडरसहारे (ऐवजदार) | ५) | श्रीमती नंदा मनोज देशपांडे (ऐवजदार) |







### शहीद सफाई सैनिक दिनानिमित्त महापौर व आयुक्तांच्या हस्ते ५० गुणवंत कर्मचाऱ्यांचा सत्कार

स्वच्छ व सुंदर शहर साकारण्यात सफाई कर्मचाऱ्यांचे मोठा योगदान आहे. शहराची स्वच्छता सफाई कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहे. कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य पार पाडावे. यासोबतच आपल्या आरोग्याची काळजी प्राधान्याने घ्यावी. व्यसनांपासून दूर रहावे. आपल्या कार्याची पावती नक्कीच आपल्याला मिळेल, असे मार्गदर्शन महापौर नंदा जिचकार यांनी केले.

शहीद सफाई सैनिक दिनानिमित्त सोमवारी (ता. ३१) मनपा मुख्यालय, सिव्हील लाईन येथे ५० गुणवंत कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी महापौर नंदा जिचकार होत्या. यावेळी विरोधी पक्षनेता तानाजी वनवे, महिला व बाल कल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे, मनपा आयुक्त अश्विन मुदगल, नगरसेविका वंदना चांदेकर, विरंका भिवगडे, रश्मी धुर्वे, रुतिका मेश्राम, नगरसेवक विजय चुटेले, लखन येरावार, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, मनपा राष्ट्रीय कर्मचारी युनीयनचे कार्याध्यक्ष राजेश हातीबेड तसेच दहाही झोनचे झोनल अधिकारी, स्वास्थ निरीक्षक व सफाई कामगार मोठ्या संख्येत उपस्थित होते.

यावेळी मनपा आयुक्त अश्विन मुदगल म्हणाले, शहीद सफाई सैनिक दिनानिमित्त शहराच्या स्वच्छतेसाठी दिवसरात्र झटणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात येत आहे, ही कौतुकाची बाब आहे. मा. पंतप्रधानाच्या स्वच्छ भारत अभियानाला यशस्वी करण्यात सफाई कामगारांचा खारीचा वाटा आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडल्यास स्वच्छ नागपूर साकारणे सहज शक्य असल्याचे सांगत आयुक्तांनी गुणवंत सफाई कर्मचा-यांचे अभिनंदन केले.

यावेळी शहीद सफाई सैनिक दिनानिमित्त मुंबई येथील मंत्रालय ते नागपूरचा प्रवास सायकलवर पूर्ण करुन सोमवारी नागपुरात दाखल झालेल्या चौघांचाही सत्कार महापौरांच्या हस्ते कार्यक्रमादरम्यान करण्यात आले.